(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६ अ करिता)

क्र.पोमसं/५अ/रापोउपनि अर्हता परीक्षा/०७/२०१४
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक :- १८/०७/२०१७

वाचा:- १. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, अर्धशासकीय पत्र क्र.पीएमएन-०१०९/क्र.५१५/पोल-५ब, दि.०६/०७/२००९.

२. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, पत्र क्र.पीएमएन-०१०९/क्र.५१५/ पोल-५ब, दि.१०/०८/२००९ व

३. सन २०१४, महाराष्ट्र अधिनियम क्र.१४, दिनांक २५ जून २०१४ व सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.११ दि.०६ एप्रिल २०१५

४. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या.१२, दिनांक २८/०४/२०१५, आणि अधिसूचना सुधारणा दि.१६/०७/२०१५ व दि.१५/०६/२०१७

## -: आदेश :-

महाराष्ट्र शासनाने संदर्भाधीन पत्रान्वये दिलेल्या सूचना वजा आदेश लक्षात घेऊन संदर्भ क्र.४ वरील अधिनियमानुसार नव्याने स्थापन केलेल्या पोलीस आस्थापना मंडळ क्र.-२ यांनी केलेल्या शिफारशीनुसार खालील अर्हताप्राप्त सहायक पोलीस उपनिरीक्षक/पोलीस हवालदार यांना त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून, "राखीव पोलीस उपनिरीक्षक" पदावर खालील अटींच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे. सदर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना, त्यांच्या नावासमोर रकाना क्र.५ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी/घटकात करण्यात येत आहे:-

| अ.क्र | पोहवा/सहापोउपनि यांचे नांवं | सध्याची नेमणूक | संदर्भ क्र.४ च्या तरतुदीनुसार वाटप करण्यात आलेला महसुल संवर्ग | राखीव पोलीस उपनिरीक्षक पदावर तात्पुरत्या स्वरुपात दिलेल्या पदोन्नतीवरील नेमणूक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सहापोउपनि/१७८ ग्यानसिंग अजाबराव डाबेराव | बुलढाणा | नाशिक | पोप्रके.धुळे | रिक्त पदात |
| २ | पोहवा/४६० भाऊसाहेब सिध्दप्पा काणे | कोल्हापूर | पुणे | पोप्रके.तासगावं सांगली | रिक्त पदात |
| ३ | पोहवा/२७८ चांदसाहेब मोल्ला तांबोळी | सोलापूर शहर | पुणे | पोप्रके.सोलापूर | रिक्त पदात |
| ४ | पोहवा/५८३६ सुखदेव अधिकराव भोगिल | ठाणे शहर | कोकण-II | लोहमार्ग मुंबई | रिक्त पदात |
| ५ | पोहवा/४९८३ संतोष सुदाम गिरी | नागपूर शहर | कोकण-I | रत्नागीरी | रिक्त पदात |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | पोहवा/६२ संतोष सिताराम जाधव | पुणे शहर | पुणे | पोप्रके.नानवीज | रिक्त पदात |
| ७ | पोहवा/२६० किसन परशुराम राठोड | पोप्रके.अकोला | औरंगाबाद | हिंगोली | रिक्त पदात |
| ८ | सहापोउपनि/५३८४ गणेश परमेश्वर जाधव | नांदेड | औरंगाबाद | पोप्रकें.लातूर | रिक्त पदात |
| ९ | सहापोउपनि/२१९१ सौदागर मारुती सावरे | बीड (प्रतिनियुक्तीवर पोप्रकें.जालना) | औरंगाबाद | बीड | रिक्त पदात |
| १० | पोहवा/१५१३ बाबुराव हनुमंत जाधव | नांदेड | कोकण-II | मुंबई शहर | रिक्त पदात |
| ११ | पोहवा/७५१३ गणेश आश्रुबा जावळे | बृहन्मुंबई | पुणे | सातारा | रिक्त पदात |
| १२ | पोहवा/२८२७ पांडुरंग दिगंबर वालावलकर | लोहमार्ग मुंबई | कोकण-II | पोप्रकें.मरोळ | रिक्त पदात |
| १३ | पोहवा/५४५ उमेश व्यंकटराव गवई | नागपूर ग्रामीण | पुणे | पोप्रके.तासगांव सांगली | रिक्त पदात |
| १४ | पोना/३८० संजीवकुमार पंढरीनाथ नाईक | अहमदनगर | पुणे | पोप्रके.नानवीज | रिक्त पदात |

१. उपरोक्त नमूद सहापोउपनि/पोहवा यांना पदोन्नतीवर राखीव पोलीस उपनिरीक्षक पदावर हजर होण्यासाठी कार्यमुक्त केल्याचा, तसेच ते पदोन्नतीवर हजर झाल्याचा दिनांक कृपया त्याच दिवशी या कार्यालयास कळवावा.

२. उपरोक्त नमूद सहापोउपनि/पोहवा यांच्याविरुध्द विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रस्तावित/प्रलंबित असेल अथवा ते शिक्षा भोगत असतील, तर त्यांना पदोन्नतीवर हजर होण्यासाठी कार्यमुक्त न करता त्यांच्या चौकशीबाबत/शिक्षेबाबत सविस्तर अहवाल या कार्यालयास तात्काळ पाठवावा.

३. उपरोक्त नमूद ज्या सहापोउपनि/पोहवा विरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित आहे, अथवा विभागीय चौकशी निर्गमित केलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही, अशा सहापोउपनि/पोहवा यांना भविष्यात होणारी शिक्षा ते पदोन्नतीच्या पदात भोगण्यास तयार असल्याची त्यांची लेखी पूर्व संमती घेवून व त्यास अधिन राहूनच, त्यांना पदोन्नतीवर सोडण्यात यावे. तसेच संबंधीत सपोउपनि/पोहवा यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त केलेल्या आदेशांतही तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. सदर आदेशाची व त्यांच्या लेखी हमीपत्राची प्रत ह्या कार्यालयातील कार्यासन अधिकारी, का.क्र.५-अ व का.क्र.११-अ यांना स्वतंत्र्यपणे लक्षवेध करून, न चुकता सादर करण्यात यावी. तसेच, त्याची प्रत संबंधीत सहापोउपनि/पोहवा ज्या घटकात आता पदोन्नतीवर जात आहेत, त्या घटकप्रमुखांना देखील न चुकता पाठवावी. तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास कार्यासन क्र.५-अ यांना लक्षवेध करून सादर करावा.

४. विमुक्त, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग यांच्या पदोन्नत्या या मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेल्या मूळ याचिका क्रमांक ८४५२/२००४ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहेत.

५. ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे त्यांनी कवायत निदेशनाचा (DDI) चा पाठ्यक्रम पूर्ण केल्याची खात्री झाल्यावर त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करावे व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**६. ज्यांनी कवायत निदेशनाचा (DDI) चा पाठ्यक्रम केला नसेल, त्यांना राखीव पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात येऊ नये व तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.**

७. पदोन्नतीवरील नेमणूकीच्या ठिकाणी कार्यभार ग्रहण केल्याचा दिनांक संबंधित घटक प्रमुखांनी त्याच दिवशी फॅक्स क्र.०२२-२२०२६५६६ व्दारे लक्षवेध कक्ष ५-अ करुन कळवावा.

८. पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावरील वेतन वाढीनंतर वेतन निश्चिती करिता द्यावयाच्या विकल्पासंबंधी अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपूर-१००९/प्र.क्र.२७/सेवा-९, दि.२२/०४/२००९ मधील आदेशाची माहिती पदोन्नती झालेल्या राखीव पोलीस उपनिरीक्षकांना कृपया द्यावी.

९. सध्या राज्यात काही ठिकाणी होत असलेल्या नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या सदस्य पदांच्या तसेच विधानसभा सार्वत्रिक निवडणूकां संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या क्र.रनिआ/नप-२०११/प्र.क्र.२०/का.०६, दि.०१/११/२०११ च्या आदेशान्वये दिलेल्या सूचना विचारात घेता संबंधीत घटक प्रमुखांनी संबंधीत सहापोउपनि/पोहवा यांना राखीव पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नतीवरील नेमणुकीच्या ठिकाणी कार्यमुक्त/हजर करुन घेणेबाबत आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घेऊन, पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी व त्यांना कार्यमुक्त केल्याचा व ते पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्याचा दिनांक कृपया या कार्यालयास सत्वर कळवावा.

१०. पोलीस महासंचालक यांनी सर्व पदोन्नत अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले असून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. कृपया त्या संबंधित अधिकाऱ्यांना कळवाव्यात.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई/ठाणे शहर/पुणे शहर/नागपूर शहर/सोलापूर शहर/नांदेड शहर
पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/बुलढाणा/बीड/ कोल्हापूर/नागपूर ग्रामीण/अहमदनगर/रत्नागीरी/सातारा
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र.

प्रत:

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, /नवी मुंबई, कोकण परिक्षेत्र/नांदेड परिक्षेत्र
अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व संबंधित कोषाधिकारी

प्रत सस्नेह सादर,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल, मुंबई-१/ नागपूर-२
कार्यासन अधिकारी, का.क्र.३-अ/९/११-अ/३६/४०.